## माहितीच्या अधिकाराखाली अपील कसे दाखल करावे

### १. कोण अपीलकर्ता बनु शकतो? (कोण अपील दाखल करू शकतो?)

माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(१) नुसार, ज्या कोणत्याही व्यक्तीला, माहितीच्या अधिकाराखाली अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या (अर्ज हस्तांतरित केला असल्यास ३५ दिवसांच्या) मुदतीत कोणताही निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा जन माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाने जी व्यथित झाली असेल, अशा कोणत्याही व्यक्तीला संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांमधील प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

कलम १९(२) नुसार, कलम ११ अन्वये त्रयस्थ पक्षाची माहिती प्रकट करण्याबाबत केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आलेले असेल अशा प्रकरणात, संबंधित त्रयस्थ पक्षाद्वारे करावयाचे अपील हे आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत करण्यात येईल.

कलम १९(३) नुसार, पोटकलम (१) खालील निर्णयाविरूद्धचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल:

परंतु, अपीलकर्त्याला वेळेत अपील दाखल न करण्यास वाजवी कारण होते अशी, यथास्थिती, केंद्रीय माहिती आयोगाची किंवा राज्य माहिती आयोगाची खात्री पटली तर, नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याला अपील दाखल करून घेता येईल.

### २. प्रथम अपील

प्रथम अपील हा माहितीच्या अधिकाराखालील अर्जदाराला निर्धारित कालावधीमधील अप्रकट, दुर्लक्षित किंवा असमाधानकारक अर्जासंदर्भात उपलब्ध असलेला प्राथमिक दिलासा आहे.

कलम ७(८)(३) अन्वये, अपीलिय जन माहिती प्राधिकाऱ्याबाबत तपशील पुरवणे जन माहिती अधिकाऱ्यासाठी अनिवार्य आहे. त्यामुळे, जन माहिती अधिकाऱ्याकडून मिळालेल्या उत्तरातून प्रथम अपील प्राधिकाऱ्याबाबत तपशील मिळू शकतो.

### ३. प्रथम अपील अर्जाची प्रक्रिया:


- माहितीचा अधिकार अधिनियम, २०० किंवा माहितीचा अधिकार नियम, २०१२ मध्ये कोठेही व्यथित पक्षाला प्रथम अपीलाचा मसुदा बनवणे आणि प्रथम अपील दाखल करणे यासंदर्भात मार्गदर्शक ठरेल

अशा निर्धारित नमुन्याचा उल्लेख आढळत नाही. परंतु, संबंधित सरकारी कार्यालयाच्या वेबसाईट आणि नियमांची त्यात प्रथम अपीलाचा नमूना पुरवण्यात आलेला आहे काय यासाठी तपासणी करणे श्रेयस्कर ठरेल.

- भारत सरकारच्या कार्मिक आणि प्रशिक्षण खात्याने जारी केलेल्या ‘माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रथम अपीलिय प्राधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना’ दिनांकीत २५.०४.२००८ अन्वये पुढील तरतूद करण्यात आलेली आहे:

  *‘तरी, अपीलिय प्राधिकाऱ्याने केवळ न्याय मिळेल याकडेच लक्ष केन्द्रित न करता न्याय दिल्याचे जाणवेल याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी, अपीलिय प्राधिकाऱ्याने जारी केलेले आदेश हे निर्णयाप्रत पोहोचण्याची कारणे विषद करणारे सकारण आदेश असणे आवश्यक आहे.’*

- त्यामुळे, समर्थित सकारण आदेश मिळण्यासाठी अपीलकर्त्याने सर्व संबद्ध, आवश्यक असलेली कागदपत्रे अपीलाच्या मसुदयाला जोडून पुरवणे आवश्यक ठरते.
- अपीलाची मांडणी करताना त्याचे पुढील भागांमध्ये विभाजन करता येईल:



प्रथम अपील

तपशील

अपीलकर्ता
नाव
माहितीच्या अधिकाराचा अर्ज सादर केल्याची तारीख
उत्तराची तारीख/ उत्तर देण्याच्या कालावधीच्या शेवटच्या दिवसाची तारीख
अर्ज क्रमांक
माहिती अधिकार पोस्टल ऑर्डर क्रमांक
अपील पोस्टल ऑर्डर क्रमांक
माहिती शुल्क भरण्याच्या पावती क्रमांक
माहिती पोहचवण्यासाठी पत्ता

जन माहिती अधिकारी
नाव, उपलब्ध असल्यास
खाते किंवा विभाग
उत्तराची तारीख
उत्तराचा पत्र क्रमांक

अपीलाचा मसुदा

तथ्ये
मागवलेली माहिती
जन माहिती अधिकाऱ्याने केलेली कार्यवाही

मुद्दे

आधार

विनंती

जोडपत्रे

माहितीच्या अधिकाराखालील अर्जाची प्रत


प्रति – शुल्काची पावती, पोस्टल ऑर्डरची पावती, पोस्टाची पावती, माहितीच्या अधिकाराखालील अर्जाच्या संदर्भात

जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराची प्रत

अन्य संबंधित कागदपत्रांच्या प्रति
उद्धरणाची (संदर्भित निकालाची) प्रत
अन्य साहित्य, जसे वृत्तांत, वृत्तपत्र इ.

- माहितीच्या अधिकाराचे अर्ज सादर करण्यासाठीच्या इलेक्ट्रॉनिक पोर्टल्सवर (राज्याच्या किंवा केंद्राच्या) त्याच पोर्टलद्वारे अपील दाखल करण्याची सुविधा पुरवलेली असते. माहितीच्या अधिकाराखालील अर्ज ऑफलाइन पद्धतीने सादर केलेला असल्यास, प्रथम अपीलदेखील ऑफलाइन पद्धतीनेच दाखल करावे लागते. हे अपील वर दिलेल्या माहितीनुसार असणे आवश्यक असते.
- केंद्र सरकारकडे सादर केलेल्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जाच्या संदर्भात अपील करत असल्यास, अपील दाखल करताना अतिरिक्त शुल्क भरण्याची आवश्यकता नसते. परंतु, राज्य शासनाच्या अधिपत्याखालील सार्वजनिक प्राधिकरणांच्या संदर्भात असे असेलच असे नाही.
- उदाहरणार्थ, महाराष्ट्रामध्ये अपीलासोबत २० रुपये मूल्याचे कोर्ट फी स्टॅम्प जोडावे लागतात. मध्य प्रदेशमध्ये अपील दाखल करताना ५० रुपये शुल्क भरावे लागते. ओरिसामध्ये देखील कोर्ट फी स्टॅम्पच्या माध्यमातून आवश्यक ते शुल्क भरावे लागते. त्यामुळे, आधी या संबंधातील सरकारचे नियम तपासून त्यानुसार अपील दाखल करणे श्रेयस्कर ठरते.
- अपील मा. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये, केंद्रीय माहिती आयोग, राज्य माहिती आयोग यांचे आदेश, केंद्रीय कार्मिक आणि प्रशिक्षण खात्याचा आदेश इत्यादींवर आधारित असणे अपीलावरील सुनावणीच्या दरम्यान केलेल्या कायदेशीर युक्तिवादाला बळ देते.
- प्रथम अपीलाच्या प्रक्रियेनुसार, एकदा अपील दाखल केल्यानंतर त्या अपीलाला उत्तर देण्यासाठी प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याला अपील दाखल केल्याच्या तारखेपासून ४५ दिवसांचा कालावधी देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

### ४. कोणत्या परिस्थितीत प्रथम अपील दाखल करता येते:




प्रथम अपील केव्हा दाखल करता येईल

कलम १९(१)

जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर न दिल्यास
तीस दिवसांच्या कालावधीत
अन्य खाते/ विभागाकडे अर्ज अंतरीत केल्यास ३५ दिवसात
कलम ११(१) अन्वये तृतीय पक्षाला नोटिस देण्याचा कालावधी – ४० दिवस

निर्णयाने व्यथित असल्यास
निर्णयाने व्यथित असल्यास
असमाधानकारक
अपूर्ण
चुकीची
नकार

कलम १९(२)
तृतीय पक्षास जन माहिती अधिकाऱ्याने माहिती पुरवण्याचा आदेश दिलेला असल्यास, तृतीय पक्ष अशा मागणीच्या विरोधात अपील करू शकेल


**५. काय करावे आणि काय करणे टाळावे**

- प्रथम अपील दाखल करताना काही मूलभूत बाबी ध्यानात ठेवणे आवश्यक असते. पुढील युक्त्या त्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकतात:-
- माहितीचा अधिकार अधिनियम वाचल्याने अपीलाची प्रभावी मांडणी करणे सोपे जाईल. अधिनियमाच्या वाचनामिळे कायदा पारित करताना त्यामागील उद्देश काय होता हे समजून घेणे आणि कायद्यावर आधारित भक्कम कारणे देणे आणि सबळ युक्तिवाद करणे शक्य होईल.
- प्रथम अपील संक्षिप्त आणि मुद्देसूद ठेवावे. वर दिलेले घटकांपैकी चौथ्या मुद्द्यातील सारिणीकडे विशेष लक्षं द्यावे. अपीलाचा मजकूर नेमका व मुद्देसूद असावा. तपशील काळजीपूर्वक लिहावा.
- जन माहिती अधिकाऱ्याचे कृत्य माहितीचा अधिकार अधिनियमाच्या विरोधात कसे आहे हे अपीलातील मुद्यांवरून स्पष्ट होणे आवश्यक आहे. या संदर्भात जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर देताना किंवा न देऊन ज्या कायदेशीर तरतुदींचा भंग केला असेल त्या स्पष्ट नमूद करा. प्रत्येक मुद्दयासाठी वेगळा परिच्छेद करावा.
- सर्व कागदपत्रे अपीलाला जोडावीत. या जोडपत्रांना क्रमांक द्यावेत. युक्तिवादामध्ये संबंधित जोडपत्र क्रमांकाचा संदर्भ द्यावा.
- प्रत्येक छायाप्रतीच्या तळाशी स्वत:ची सही करून तिला अधिकृत केल्याने त्या प्रतीचा अधिकृतपणा स्पष्ट होतो आणि कागदपत्रांच्या अधिकृततेची हमी दिली जाते.
- प्रथम अपील स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर एडी टपालाने पाठवणे आवश्यक आहे. यामुळे तुम्हाला टपाल पोहोचवण्याच्या प्रक्रियेवर भारतीय डाक विभागाच्या वेबसाइटमार्फत देखरेख करता येते. शिवाय त्यायोगे अपील वेळेत दाखल झाल्याचा पुरावादेखील हाती येतो.
- माहितीच्या अधिकाराखालील कागदपत्रे सादर करताना कुरीयर सेवेचा वापर टाळावा.

- अपीलाच्या कागदपत्रांचा एक संच तुमच्याजवळ जपून ठेवावा. अपीलाच्या सुनावणीसाठी तुम्हाला हजर राहण्यास सांगितले जाईल तेव्हा ते उपयुक्त ठरेल.
- अपीलावर व्हर्च्युअल सुनावणी घेण्याची देखील तरतूद आहे. तुम्हाला व्हर्च्युअल सुनावणी हवी असल्यास तसे आधी कळवणे आवश्यक आहे.

## ६. द्वितीय अपील

- प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याने अपीलाला दिलेले उत्तर देखील काही वेळा असमाधानकारक असते आणि त्यासंदर्भात त्याहून वरिष्ठ प्राधिकाऱ्याकडे दाद मागण्याची तुम्हाला इच्छा असते. काही प्रसंगी प्रथम अपीलिय प्राधिकारी तुमच्या प्रश्नाला निर्धारित वेळेत उत्तर देत नाही.
- माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १९(३) नुसार, प्रथम अपीलावर आदेश जारी झाल्या दिवसापासून ९० दिवसांच्या मुदतीत प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याच्या अशा निर्णयाच्या विरोधात अपील दाखल करता येते.
- माहितीचा अधिकार नियम, २०१२ च्या नियम क्र. ८ अन्वये, प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याच्या निर्णयामुळे, किंवा त्याने अपील निकालात न काढल्यामुळे व्यथित अपीलार्थी प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याच्या आदेशाच्या विरोधात राज्य किंवा केंद्रीय माहिती आयोगापुढे अपील करू शकेल.
- **कोठे दाखल करावे:**




राज्य सरकारशी संबंधित अर्जाच्या संदर्भातील अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल होईल, तर केंद्र सरकारशी संबंधित अर्जाच्या संदर्भातील अपील केंद्रीय माहिती आयोगाकडे दाखल होईल.

- राज्य माहिती आयोग किंवा केंद्रीय माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल करण्याची प्रक्रिया प्रथम अपील दाखल करण्याच्या प्रक्रियेप्रमाणेच आहे. केंद्र सरकारच्या संबंधातील अपील https://www.cic.gov.in या अधिकृत वेबसाईटच्या माध्यमातून दाखल करता येईल, तर राज्य सरकारच्या संदर्भातील अपील संबंधित राज्याच्या ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून दाखल करता येईल.
- माहिती अधिकार नियम, २०१२ मधील 'अपीलाचा नमूना' अनुसूचीमध्ये प्रकरण निकाली काढण्यासाठी अपीलिय प्राधिकरणाला सादर करण्याच्या कागदपत्रे आणि तपशीलाची यादी पुढीलप्रमाणे दिलेली आहे:-
  *अपीलार्थीचे नाव व पत्ता*
  *ज्या केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याला अर्ज संबोधित केला होता त्याचे नाव व पत्ता*
  *ज्या केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने अर्जाला उत्तर दिले होते त्याचे नाव व पत्ता*
  *प्रथम अपीलावर ज्या प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याने निकाल दिला त्याचे नाव आणि पत्ता*
  *अर्जाचा तपशील*
  *आदेशाचा तपशील आणि ज्या आदेशाच्या विरोधात अपील आहे त्या आदेशाचा क्रमांक (असल्यास)*

*अपीलाची संक्षिप्त तथ्ये*
*प्रार्थना किंवा मागत असलेला दिलासा*
*प्रार्थना किंवा मागितलेल्या दिलाशाचे समर्थन करणारी कारणे*
*अपीलाशी संबंधित आणि माहिती*
*अपीलार्थीने केलेले प्रमाणीकरण/ अधिकृततेचे ज्ञापन*

- परंतु, माहिती अधिकार नियम, २०१२ च्या नियम १० अनुसार, अनुसूचीत दिलेल्या नमुन्यात नाही या कारणाने कोणतेही अपील रद्द करता येणार नाही. त्यामुळे अपिलार्थीला पुढील कालावधीत कागदपत्रे सादर करण्याची संधी मिळते.
- साध्या कोऱ्या कागदावर प्रकरणाची माहिती, अपील दाखल करण्याची कारणे आणि अपील नाकारण्याची कारणे नेटकेपणे लिहून अपील दाखल करता येते. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याने दिलेली उत्तरे (असल्यास) अपील स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर एडी टपालाने पाठवण्यापूर्वी जोडण्यास विसरू नये.
- सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोगाने पूर्वी दिलेल्या सुसंबद्ध निकालांची नेमकी उद्धरणे दिल्यामुळे पूर्वपरंपरा असल्याचे दर्शवले जाऊन अपीलाला अधिक बळ मिळते.
- द्वितीय अपील निकाली काढण्यासाठी निश्चित कालावधी निर्धारित केलेला नाही. प्रलंबित प्रकरणे निकालात काढली जाण्याचा दर विचारात घेता, द्वितीय अपीलावर सुनाववणी होण्यास सहसा एक ते दोन वर्षे एवढा काळ लागू शकतो.

**७. तज्ञांचा सल्ला:**

*माजी केंद्रीय माहिती आयुक्त शैलेश गांधी यांनी प्रथम किंवा द्वितीय अपील दाखल करण्याबाबत पुढील महत्वाच्या बाबी स्पष्ट केल्या आहेत:-*

- अपील प्राप्त झाल्यापासून निर्धारित कालावधीत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याने आदेश जारी न कल्यास त्याला ‘मानीव नकार’ समजले जाते आणि अशा परिस्थितीत प्रथम अपील दाखल केल्या दिवसापासून १२० दिवसांच्या मुदतीत द्वितीय अपील दाखल करता येईल.
- प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याने जन माहिती अधिकाऱ्यास मागवलेली माहिती देण्याचे आदेश जारी केले असतील आणि जन माहिती अधिकाऱ्याने तसे करण्यात कसूर केली असल्यास, द्वितीय अपील दाखल करण्यापूर्वी प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याकडे दाद मागावी.
- तुमच्या प्रकरण्याची सुनावणी प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्यापुढे व्हावी अशी तुमची इच्छा असल्यास अपीलात तसे नमूद करावे आणि तुमची तशी इच्छा नसल्यास तसेही स्पष्ट करावे. माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींनुसार प्रत्यक्ष सुनावणीला मंजूरी देणे प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्यासाठी बंधनकारक आहे.
- ऑफलाइन पद्धतीने अपील दाखल करत असल्यास ते स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर एडी टपालाने पाठवणे सुनिश्चित करावे. त्यामुळे टपाल पोहोचवण्याच्या प्रक्रियेवर ऑनलाइन देखरेख करता येते आणि टपाल पोहोचल्याचा पुरावा हाती येतो.
- राज्य माहिती आयोगापुढे प्रथम आणि द्वितीय अपील दाखल करण्याचे शुल्क त्या त्या राज्यानुसार बदलते. काही प्रकरणात अपील अपुऱ्या शुल्कासह पोहोचल्यास, जन माहिती अधिकारी/ प्रथम

अपीलिय प्राधिकारी थेट अर्ज नामंजूर करण्याऐवजी अर्जदाराला आवश्यक तेवढी रक्कम भरण्यास सांगू शकतो.

**८. दुसऱ्या अपीलाची कालमर्यादा**

माहितीचा अधिकार अधिनियमात द्वितीय अपील निकाली काढण्यासाठी कालमर्यादा दिलेली नाही. तथापि, वेगवेगळया उच्च न्यायालयांनी या संदर्भात पुढीलप्रमाणे निरीक्षणे नोंदवलेली आहेत:-

- अखिल कुमार रॉय वि. पश्चिम बंगाल माहिती आयोग आणि अन्य (२०१० ची रिट याचिका क्र. ११९३३(W)) या प्रकरणात मा. कलकत्ता उच्च न्यायालयाने म्हणले आहे की:-

*"कलम १९(१) अन्वये केलेल्या प्रथम अपीलावरील निकालातून द्वितीय अपील उद्भवते, आणि प्रथम अपील कलम ७ नुसार घेतलेल्या निर्णयात किंवा निर्णय घेण्यात आलेल्या अपयशातून उद्भवते. अधिनियमाच्या कलमांमधून विणलेली वेगाची वीण मोकाट सोडले गेलेल्या द्वितीय अपीलामुळे अचानक सुटते. द्वितीय अपीलाच्या या मुक्त योजनेमुळे कलम ६ नुसार केलेली विनंती पुर्णपणे भरकटून अनेक स्तरांवर या प्रकरणाप्रमाणे टाळता येण्याजोगे आणि नकोसे न्यायालयीन प्रक्रियांचे फाटे फुटतात.*
*आमच्या मते, कलम १९(१) अन्वये प्रथम अपील निकाली काढण्यासाठी आणि कलम ७ अन्वये माहिती मिळण्यासाठी केलेली विनंती निकालात काढण्यासाठी निर्धारित केलेली कमाल कालमर्यादा लक्षात घेता, द्वितीय अपीलिय प्राधिकरणाने द्वितीय अपीलाचा निपटारा ते दाखल केल्या दिवसापासून ४ दिवसात करणे अपेक्षित होते. कायद्याची योजना लक्षात घेता, द्वितीय अपील निकाली काढण्यासाठी एवढा कालावधी रास्त समजाला जावा असे आम्हाला वाटते. आमचे असे मत आहे की, ही याचिका प्राधिकरणाला अपीलाचे निराकरण करण्याचे निर्देश देऊन निकाली काढण्यात यावी.*
*या कारणांमुळे, द्वितीय अपीलिय प्राधिकरणाने हा आदेश पोहोचल्यापासून ४५ दिवसात याचिकाकर्त्याच्या द्वितीय अपीलावर निर्णय घ्यावा असा आदेश देऊन आम्ही ही याचिका निकाली काढत आहोत."*

- आलोक पटवारी वि. पश्चिम बंगाल माहिती आयोग आणि अन्य या वेगळ्या प्रकरणात मा. कलकत्ता उच्च न्यायालयाने २०१० ची रिट याचिका क्र. ११९३३(W) या प्रकरणातील निकालाचा हवाला देत ग्राह्य धरले आहे की:-

*"या विद्वान न्यायमूर्तींच्या आदेशाशी आम्ही पुर्णपणे सहमत आहोत आणि असे ग्राह्य धरत आहोत की याचिकाकर्त्यांने दिनांक १९ एप्रिल, २०१० रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाचे निराकरण ते प्राप्त झाल्या दिवसापासून ४५ दिवसात होणे अपेक्षित होते."*

- जयप्रकाश रेड्डी वि. केंद्रीय माहिती आयोग आणि भारत सरकार या प्रकरणात मा. न्यायालयाने नमूद केले आहे की:-

*द्वितीय अपीलावर निर्णय घेण्यासाठी समयसीमा निर्धारित केलेली नाही याची खरोखरच दखल घ्यावी लागेल. तथापि, जेव्हा कालावधी निर्धारित केलेला नसेल, तेव्हा त्याचा अर्थ त्यावर (त्या प्रकरणावर) रास्त वेळेत निर्णय घेण्यात यावा असा लावण्यात यावा. प्रथम अपीलावर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा निर्धारित केलेली असल्याने, तसाच कालावधी द्वितीय अपीलावर निर्णय घ्यायला लागेल असा निष्कर्ष काढणे सुरक्षित ठरेल. अन्यथा, त्यामुळे प्राधिकरण द्वितीय अपीलावरील सुनावणी आणि निर्णय अनिश्चित काळासाठी पुढे ढकलत राहिल्यास जिच्यामुळे अधिनियमाचे उद्देश सफल होणार नाहीत अशी परिस्थिति निर्माण होईल.*

*परिणामी, द्वितीय अपीलावर देखील ते दाखल झाल्यापासून ४५ दिवस या कालावधीहून जलद नाही तरी त्या कालावधीत निर्णय घेतला जावा असे मानता येईल."*

*<u>प्रथम अपीलाचा नमूना</u>*

## प्रथम अपील
## (माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील)

दिनांक:- ०१.०२.२०२१

| माहितीच्या अधिकाराखालील अर्जाचे तपशील | |
|---|---|
| नाव | श्री गडा |
| पत्ता | गोकुलधाम सोसायटी, पावडर गल्ली, वाशी, मुंबई |
| संपर्कासाठी दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक | १२१२१२१२१२ |
| ई-मेल ॲड्रेस | jethalal@gmail.com |
| अर्ज क्रमांक | आरटीआय/०१/२०२१ |
| माहिती अधिकाराखाली अर्ज दाखल केल्याची तारीख | ०१.०१.२०२१ |
| उत्तराची तारीख/ उत्तर देण्यासाठीची अंतिम तारीख | २६.०१.२०२१ |
| माहितीच्या अधिकाराखालील अर्जासाठीच्या पोस्टल ऑर्डरचा क्रमांक | रोख |
| माहिती शुल्काचा पावती क्रमांक | फी/०१/२०२१ |
| अपीलासाठीच्या पोस्टल ऑर्डरचा क्रमांक | XYXYXYXY |

| जन माहिती अधिकाऱ्याचे तपशील | |
|---|---|
| जन माहिती अधिकाऱ्याचे नाव | श्री भिडे |
| खाते | सार्वजनिक बांधकाम खारे, मुंबई |
| उत्तराची तारीख | २६.०१.२०२१ |
| उत्तराचा पत्र क्रमांक | रिप्लाय/१०/२०२१ |

| प्रथम अपीलाचे तपशील | |
|---|---|
| तथ्ये | अर्जदाराने पुढील माहिती मागवली:<br>०१.०१.२०१९ ते ०१.०१.२०२१ या कालावधीतील मुंबई शहरातील रस्त्यांच्या पहाणीचे अहवाल कृपया द्यावेत<br>२५ दिवसांनंतर प्रथम माहिती प्राधिकारी यांनी पत्र क्र. रिप्लाय/१०/२०२१ दिनांक २६.०१.२०२१ अन्वये उत्तर दिले की मागवलेली माहिती देता येत नाही.<br>*माहितीच्या अधिकाराखालील अर्ज आणि माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराच्या प्रती अनुक्रमे जोडपत्र क्रमांक १ आणि २ मध्ये या अपिलासोबत जोडल्या आहेत.* |
| मुद्दा | सदर माहिती माहितीच्या अधिकाराखाली पुरवण्यायोग्य आहे किंवा नाही? |
| कारणे | कलम २(च) अन्वये माहितीच्या व्याख्येत 'अहवाल' समाविष्ट आहे. त्यामुळे सदर माहिती माहितीच्या अधिकाराच्या अधींनियमाच्या कक्षेत येते. |

| | |
|---|---|
| **प्रार्थना (विनंती)** | अर्जदाराची विनंती की, मागवलेली माहिती त्याला पुरवण्यात यावी. |

| **जोडपत्रांची यादी** | | |
|---|---|---|
| **अनु क्र** | **जोडपत्र क्र.** | **तपशील** |
| ०१ | A1 | माहितीच्या अधिकाराखालील अर्ज दिनांक ०१.०१.२०२१ |
| ०२ | A2 | जन माहिती अधिकारी यांचे उत्तर दिनांक २६.०१.२०२१ |
| ०३ | A3 | शुल्क रु १० भरल्याची पावती क्र. फी/०१/२०२१, दिनांक ०१.०१.२०२१ |

*<u>द्वितीय अपीलाचा नमूना</u>*

मा. केंद्रीय माहिती आयुक्त, नवी दिल्ली यांचेसमोर

फाईल क्र. ______________________

(माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अन्वये)

सूची

श्री __________________________

----- अपीलार्थी

विरुद्ध

वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया
त्यांच्या केंद्रीय जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत

----- प्रतिवादी


| अनु क्र | तपशील | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १. | सूची | १-२ |
| २. | दिनांक आणि घटना | ३-९ |
| ३. | द्वितीय अपील | १०-३३ |
| ४. | जोडपत्र क्र १: सर्व वृत्तपत्रांची यादी, त्यातील संबंधित उताऱ्यांसाह | ३४-३६ |
| ५. | जोडपत्र क्र २: सर्व वृत्तपत्रांच्या सत्य प्रती | ३७-५४ |
| ६. | जोडपत्र क्र ३: दिनांक ०९.०८.२०१८ रोजी २०१२ च्या प्रकरण क्रमांक डब्ल्यूपी (पीआयएल) ०६ मध्ये पारित आदेशाची प्रत | ५५-६३ |
| ७. | जोडपत्र क्र ४: दिनांक ०८.०१.२०१९ रोजी २०१२ च्या प्रकरण क्रमांक डब्ल्यूपी (पीआयएल) ०६ मध्ये पारित आदेशाची प्रत | ६४-६६ |
| ८. | जोडपत्र क्र ५: २०१२ च्या प्रकरण क्रमांक डब्ल्यूपी (पीआयएल) ०६ मध्ये पारित केलेल्या आदेशांची मा. उत्तराखंड उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध यादी | ६७-६९ |
| ९. | जोडपत्र क्र ६: माहितीच्या अधिकाराखालील अर्ज दिनांक १५.०५.२०१९ ची सत्य प्रत | ७० |
| १०. | जोडपत्र क्र ७: केंद्रीय जन माहिती अधिकारी यांचे उत्तर दिनांक २२.०५.२०१९ ची सत्य प्रत | ७१ |
| ११. | जोडपत्र क्र ८: प्रथम अपील दिनांक ३०.०५.२०१९ ची सत्य प्रत | ७२-७३ |
| १२. | जोडपत्र क्र ९: प्रथम अपील दिनांक १३.०६.२०१९ ची सत्य प्रत | ७४ |
| १३. | जोडपत्र क्र १०: द्वितीय अपील अर्ज दिनांक १०.०७.२०१९ ची सत्य प्रत | ७५-७९ |
| १४. | जोडपत्र क्र ११: वन खात्याच्या अधिकाऱ्यांना पाठवलेल्या ई-मेल्स दिनांक | ८०-८९ |

| | | |
|---|---|---|
| | १६.०४.२०२० च्या सत्य प्रती एकत्रित जोडलेल्या | |
| १५. | जोडपत्र क्र १२: भारत सरकारने माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रथम अपीलिय प्राधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांसाठी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे कार्यालयीन ज्ञापन दिनांक २५.०४.२००८ | ९०-१०३ |

दिनांक: ०९/०५/२०२१

(श्री. ____________________________)
अपीलार्थी
दस्तुरखुद्द पक्षकार

मा. केंद्रीय माहिती आयुक्त, नवी दिल्ली यांचेसमोर

तारीखवार घटनाक्रम

फाईल क्र. ____________________

(माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अन्वये)

श्री ________________________

----- अपीलार्थी

विरुद्ध

वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया
त्यांच्या केंद्रीय जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत

----- प्रतिवादी

| अनु क्र. | दिनांक | घटना |
|---|---|---|
| ०१ | ०३.०८.२०१८ | मा. उत्तराखंड उच्च न्यायालयाने प्रकरण क्र रिट याचिका (जनहितार्थ याचिका) क्र. २०१२ ची ६ मधील आदेशानुसार हत्तींचा व्यावसायिक वापर करण्यावर संपूर्ण उत्तराखंड राज्यात बंदी घातली. |
| ०२ | | दिनांक ०३.०८.२०१८ च्या आदेशाला जवळपास सर्व प्रमुख माध्यमांनी देशव्यापी प्रसिद्धी दिली. माध्यमांनी पुढील बाबींना ठळक प्रसिद्धी दिली:-<br>१. हत्तीवरून फेरफटका मारण्याला संपूर्ण उत्तराखंड राज्यभर बंदी घालण्यात आली.<br>२. वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, डेहराडूनल तीन महिन्यांच्या कालावधीत या क्षेत्रातील ज्या वाहनांना वन्यजीवनास अडथळा आणण्यापासून रोखण्यासाठी परवानगी देता येईल अशा वाहनांची प्रवासी वहनक्षमता निश्चित करण्यासाठी सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले. |
| ०३ | ०९.०८.२०१८ | मा. उत्तराखंड उच्च न्यायालयाने या मुद्दयाचा, म्हणजे कलागड आणि राजाजी राष्ट्रीय उद्यानात जिप्सी जाण्यास परवानगी देण्याचा पुनरुच्चार केला<br>*“खाजगी जिप्सी/ व्यावसायिक जिप्सींना सीताबनी, बिजरानी, धिकला, ढेला, दुर्गादेवी, सोननदी परिक्षेत्रात जाऊ देण्याबाबतच्या दिनांक ३.८.२०१८ रोजी या न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाचा राज्य शासनाने चुकीचा अर्था लावला आहे. पूर्वी दिनांक ०३.०८.२०१८ रोजी दिलेल्या आदेशातील निर्देश क्र (अ) बदलून राज्य शासनाला केवळ २० खाजगी जिप्सी/ व्यावसायिक जिप्सींना प्रत्येक परिक्षेत्रात म्हणजे कलागड आणि राजाजी* |

| | | |
|---|---|---|
| | | *राष्ट्रीय उद्यानासह सीताबनी, बिजरानी, धिकला, ढेला, दुर्गादेवी, सोननदी या परीक्षेत्रात जाऊ देण्याबाबत राज्य शासनाला निर्देश देण्यात येत आहेत."* |
| ०४ | ०८.०१.२०१९ | मा. उत्तराखंड उच्च न्यायालयाने, त्याच्या दिनांक ०३.०८.२०१८ च्या आदेशाचा पुनरुच्चार केला की,<br>*"या न्यायालयाने दिनांक ३ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या आदेशान्वये मुख्य वन्यजीव वॉर्डन यांना त्यांच्या संबंधित परिक्षेत्रीय वनाधिकाऱ्यांच्या मार्फत हत्तींच्या मालकांना ते कोणत्या नियमांच्या अंतर्गत वन्यजीव सुरक्षा अधिनियम, १९७२ आणि प्राण्यांबाबत क्रूरता (प्रतिबंध) अधिनियम, १९६० चे उल्लंघन करत हत्तींचा फेरफटक्यासाठी व्यावसायिक वापर करत आहेत याबाबत नोटिसा जारी करण्याचे आदेश दिले होते.*<br>*हत्तींच्या व्यावसायिक वापरावर संपूर्ण उत्तराखंड राज्यात पुढील आदेश होईपर्यंत बंदी घालत, खंडपीठाने मुख्य वन्यजीव वॉर्डन यांना परिक्षेत्रीय वनाधिकाऱ्यांच्या मार्फत हत्तींच्या मालकांना रीतसर नोटिसा देऊन उपचार, वैधकीय तपासणी आणि योग्य ती देखभाल करण्यासाठी हत्तींचा ताबा २४ तासात घेण्याचे निर्देश दिले होते."* |
| ०५ | | आत्तापर्यंत अपीलार्थीने केवळ बातम्या पाहिलेल्या आहेत. प्रकरणाचे नाव आणि क्रमांक अपीलार्थीला माहिती नाही. अपीलार्थीने नाव, क्रमांक आणि आदेश/ निकालाच्या प्रतिसात्थि त्याचा शोध चालू ठेवला आहे. परिणामी, अपीलार्थी 'वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला वहन क्षमता निश्चित करण्यासाठी दिलेले निर्देश' या सर्व महत्वाच्या माध्यमांनी ठळक प्रसिद्धी दिलेल्या मुद्द्यावर भर देत आहे.<br>लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर अवलंबून रहात अपिलार्थीने वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्जं सादर करण्याचे ठरवले. |
| ०६ | १५.०५.२०१९ | अपीलार्थीने वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, डेहराडूनकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर केला आणि पुढील माहिती मागवली:-<br>१. ज्या प्रकरणात हा आदेश पारित केला आहे त्या प्रकरणाचे नाव<br>२. या प्रकरणाचे उद्धरण<br>३. दिनांक ०३.०८.२०१८ रोजी जारी केलेला आदेश<br>हा अर्ज वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, डेहराडूनकडे सादर केला कारण ती मा. उत्तराखंड न्यायालयाने दिनांक ०३.०८.२०१८ च्या आदेशान्वये ज्यांना निर्देश दिले त्यापैकि एक संस्था आहे. |
| ०७ | २२.०५.२०१९ | केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, डेहराडूनकडे 'निकालाची' प्रत नाही असे कारण देत अर्ज फेटाळला.<br>केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर न करता आणि संबंधित खात्याकडे अर्ज अंतरीत न करता अपीलार्थीला चीफ वाईल्ड्लाईफ |

| | | |
|---|---|---|
| | | वॉर्डनकडे जाण्यास सुचवले. |
| ०८ | ३०.०५.२०१९ | माध्यमांनी मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध केलेल्या बातम्या वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला निर्देश दिले असल्याच्या तथ्याची खातरजमा करत असल्याने माहिती देण्यात यावी, अन्यथा माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ६(३) अन्वये अर्ज दुसऱ्या संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे अंतरीत करावा असा आधार असलेले प्रथम अपील अपीलार्थीने विद्वान प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याकडे सादर केले. |
| ०९ | १३.०६.२०१९ | विद्वान प्रथम अपीलिय प्राधिकरणाने केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचे आदेश ग्राह्य धरत *"एकदा केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने एकदा अर्ज निकाली काढल्यावर अपीलिय प्राधिकरणाला तो दुसऱ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अंतरीत करण्याचा अधिकार नाही"* असा आधार देत अपील फेटाळले. |
| १० | १०.०७.२०१९ | अपीलार्थीने माहिती अधिकार कायदा, २००५ अन्वये मागितलेली माहिती मिळण्यासाठी मा केंद्रीय माहिती आयोगापुढे द्वितीय अपील सादर केले. |
| ११ | | मा. उत्तराखंड उच्च न्यायालयाने प्रकरण क्र रिट याचिका (जनहितार्थ याचिका) क्र २०१२ ची ६ मध्ये ०३.०८.२०१८ रोजी हा आदेश जारी केला असल्याचे अपीलार्थीला समजले.<br>परंतु, ०३.०८.२०१८ रोजी जारी केलेला आदेश नैनिताल येथील मा उत्तराखंड उच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर उपलब्ध नाही.<br>त्यामुळे, हा अर्ज हा ०३.०८.२०१८ रोजी जारी केलेला आदेश मिळवण्याचे एकमेव साधन आहे. |
| १२ | १६.०४.२०२० | केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या निर्देशानुसार अपीलार्थीने दिनांक ०३.०८.२०१८ रोजी जारी केलेल्या आदेशाची प्रत मिळणेकामी उत्तराखंड वन खात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांना ईमेल पाठवले. |
| १२ | ०६.०५.२०२१ | अपीलार्थीला या अपीलाच्या सुनावणीची नोटिस प्राप्त झाली. |
| १३ | | तदर्थ, हे द्वितीय अपील सादर. |

दिनांक:- ०९/०५/२०२१

(श्री ___________)
अपीलकर्ता
दस्तुरखुद्द पक्ष

मा. केंद्रीय माहिती आयुक्त, नवी दिल्ली यांचेसमोर

**तारीखवार घटनाक्रम**

**फाईल क्र. ____________________**

**(माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अन्वये)**

**श्री ________________________**

**----- अपीलार्थी**

**विरुद्ध**

**वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया**
**त्यांच्या केंद्रीय जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत**

**----- प्रतिवादी**

प्रति,

उपरिनिर्दिष्ट आयोगाचे मा. केंद्रीय माहिती आयुक्त

अपीलार्थी विनम्रतापूर्वक खालीलप्रमाणे सादर करतो की,:-

१. अपीलार्थी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये हे द्वितीय अपील सादर करत आहे. हे अपील प्रथम अपीलिय प्राधिकरणाने दिनांक १४.०६.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या विरोधात आहे.

**अपीलार्थीचा संक्षिप्त परिचय**

२. अपीलार्थी बीबीए एलएलबी (ऑनर्स) च्या पाचव्या वर्षाचा विद्यार्थी असून त्याने यापूर्वी भारताच्या मा केंद्रीय माहिती आयोगाबरोबर संशोधक प्रशिक्षणार्थी आणि प्रकल्प सहाय्यक म्हणून काम केलेले आहे. अपीलार्थीने मा. मध्य प्रदेश राज्य माहिती आयोग, भोपाळ यांचेकडे आंतरवासिता समन्वयक म्हणून देखील काम केले आहे.

त्याच्या अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या वर्षापासून अपीलार्थी हत्तींच्या संरक्षणासाठी कार्य करत आहे. यापूर्वी त्याने देशातील हत्तींच्या मृत्यूबाबतचा सांख्यिकी विदा मिळवण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर केलेले आहेत.

हत्तींच्या संरक्षणासाठी कार्य करण्याच्या उद्देशाने अर्जदाराने माहितीच्या अधिकाराखाली प्रस्तुत अर्ज दाखल केला.

त्यामुळे, अर्जदाराने या मा आयोगापुढे त्याच्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जात मागितलेली माहिती मिळवण्यासाठी प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

**<u>माहितीच्या अधिकाराखालील अर्जाचा विषय</u>**

३. मा उत्तराखंड उच्च न्यायालयाने हिमालयीन युवा ग्रामीण विकास संस्था वि उत्तराखंड राज्य सरकार आणि अन्य (रिट याचिका (जनहितार्थ याचिका) क्र २०१२ ची ६) या याचिकेमध्ये दिनांक ०३.०८.२०१८ रोजी आदेश पारित करून संपूर्ण उत्तराखंड राज्यात हत्तींवरून फेरफटका मारण्यास बंदी घातली आहे. दिनांक ०३.०८.२०१८ च्या आदेशामध्ये पुढे वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, डेहराडून यांना तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये वन्यजीवनास बाधा टाळण्यासाठी वन्यजीव उद्यानातील परिक्षेत्रांची वहन क्षमता निश्चित करून त्यायोगे आत सोडण्यासाठी वाहनांची संख्या निश्चित करण्यासाठी सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले. दिनांक ०३.०८.२०१८ च्या आदेशाबाबत देशभरातील जवळपास सर्व प्रमुख माध्यमांनी ठळक प्रसिद्धी दिली.

अशा सर्व वृत्तपत्रांची यादी त्यातील सुसंबद्ध उताऱ्यांसह अनुसूची क्र १ मध्ये प्रस्तुत अपीलाला संलग्न केली आहे. अशा सर्व वृत्तपत्रांच्या कात्रणांच्या प्रतींचा संग्रह अनुसूची क्र २ मध्ये प्रस्तुत अपीलाला संलग्न केला आहे.

४. मा उच्च न्यायालयाने पारित केलेल्या दिनांक ०९.०८.२०१८ रोजीच्या पुढील आदेशामधील पुनरुच्चार दिनांक ०३.०८.२०१८ रोजी कॉर्बेट, राजाजी आणि कालागड राष्ट्रीय उद्यानांच्या विविध परीक्षेत्रात जिप्सीना परवानगी देण्यासंदर्भात आदेश जारी केल्याची खात्री पाठवतो. त्यातील सुसंबद्ध उतारा पुढीलप्रमाणे:-

*"खाजगी जिप्सी/ व्यावसायिक जिप्सीना सीताबनी, बिजरानी, धिकला, ढेला, दुर्गादेवी, सोननदी परिक्षेत्रात जाऊ देण्याबाबतच्या दिनांक ३.८.२०१८ रोजी या न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाचा राज्य शासनाने चुकीचा अर्था लावला आहे. पूर्वी दिनांक ०३.०८.२०१८ रोजी दिलेल्या आदेशातील निर्देश क्र (अ) बदलून राज्य शासनाला दरदिवशी केवळ २० खाजगी जिप्सी/ व्यावसायिक जिप्सीना प्रत्येक परिक्षेत्रात म्हणजे कलागड आणि राजाजी राष्ट्रीय उद्यानासह सीताबनी, बिजरानी, धिकला, ढेला, दुर्गादेवी, सोननदी या परीक्षेत्रात जाऊ देण्याबाबत राज्य शासनाला निर्देश देण्यात येत आहेत."*

मा. उत्तराखंड उच्च न्यायालयाने त्याच्या दिनांक ०८.०१.२०१९ रोजीच्या आदेशात त्याच्या दिनांक ०३.०८.२०१८ च्या संपूर्ण उत्तराखंड राज्यात हत्तींवरून फेरफटका मारण्यावर बंदी घालण्याच्या आदेशाचा पुनरुच्चार केला. त्यातील सुसंबद्ध उतारा पुढीलप्रमाणे:-

*"या न्यायालयाने दिनांक ३ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या आदेशान्वये मुख्य वन्यजीव वॉर्डन यांना त्यांच्या संबंधित परिक्षेत्रीय वनाधिकाऱ्यांच्या मार्फत हत्तींच्या मालकांना ते कोणत्या नियमांच्या अंतर्गत वन्यजीव सुरक्षा अधिनियम, १९७२ आणि प्राण्यांबाबत क्रूरता (प्रतिबंध) अधिनियम, १९६० चे उल्लंघन करत हत्तींचा फेरफटक्यासाठी व्यावसायिक वापर करत आहेत याबाबत नोटिसा जारी करण्याचे आदेश दिले होते. हत्तींच्या व्यावसायिक वापरावर संपूर्ण उत्तराखंड राज्यात पुढील आदेश होईपर्यंत बंदी घालत, खंडपीठाने मुख्य वन्यजीव वॉर्डन यांना परिक्षेत्रीय वनाधिकाऱ्यांच्या मार्फत हत्तींच्या मालकांना रीतसर नोटिसा देऊन उपचार, वैधकीय तपासणी आणि योग्य ती देखभाल करण्यासाठी हत्तींचा ताबा २४ तासात घेण्याचे निर्देश दिले होते. हत्तींना तात्पुरते राजाजी राष्ट्रीय उद्यान, चिल्ला येथे ठेवण्याचे आणि जखमी/ ज्यांची देखभाल करायची आहे अशा हत्तींची आदेश पारित केल्या तारखेपासून १२ तासात पशुवैद्यांकडून तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते."*

दिनांक ०९.०८.२०१८ आणि ०८.०१.२०१९ रोजीच्या उपरोल्लेखित पुढील आदेशांमध्ये केलेले दिनांक ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाचे पुनरुच्चार दिनांक ०३.०८.२०१८ रोजीचे आदेश मा उत्तराखंड उच्च न्यायालयाने पुढील संदर्भात काढले होते याची खात्री पटवतात:-

संपूर्ण उत्तराखंड राज्यात हत्तींवरून फेरफटका मारण्यास बंदी
कॉर्बेट, राजाजी आणि कालागड राष्ट्रीय उद्यानांच्या विविध परीक्षेत्रात जिप्सींना परवानगी देणे.

दिनांक ०९.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत अनुसूची क्र ३ म्हणून प्रस्तुत अपीलास संलग्न केली आहे.
दिनांक ०८.०१.२०१९ रोजीच्या आदेशाची प्रत अनुसूची क्र ४ म्हणून प्रस्तुत अपीलास संलग्न केली आहे.

५. अन्य आदेशांप्रमाणे दिनांक ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत मा उत्तराखंड उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध नाही. मा उत्तराखंड उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या आदेशांची सूची अनुसूची क्र ५ म्हणून प्रस्तुत अपीलास संलग्न केली आहे.

**<u>प्रकरणाची संक्षिप्त तथ्ये</u>**

मा उत्तराखंड उच्च न्यायालयाने त्याच्या महत्वपूर्ण निकालात संपूर्ण उत्तराखंड राज्यात हत्तींवरून फेरफटका मारण्यास बंदी घालण्याचे आदेश दिनांक ०३.०८.२०१८ रोजी दिले, अशी बातमी अपीलार्थीने वाचली. त्यापुढे जाईन वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला वहन क्षमता निश्चित करण्याचे निर्देश दिले. ही बातमी विविध प्रमुख माध्यमांनी ठळकपणे प्रसिद्ध केली. अपीलार्थीने आदेशाची प्रत शोधली परंतु त्याला ती मिळवण्यात यश आले नाही.

परंतु, सर्व बातम्यांमध्ये वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला कॉर्बेट, राजाजी आणि कालागड राष्ट्रीय उद्यानांच्यामधील वहन क्षमता निश्चित करण्याचे आदेश दिले असण्याला देखील सर्व बातम्यात ठळक प्रसिद्धी देण्यात आली होती. या विविध बातम्यांच्या आधारे अपीलार्थीने वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाकडे तिच्या www.rti.gov.in या माहितीच्या अधिकाराच्या पोर्टलद्वारे दिनांक १.०.२०१९ रोजी माहितीच्या अधिकाराखाली ऑनलाइन अर्ज केला. या अर्जामध्ये पुढील माहिती मागितली होती:-

i. प्रकरणाचे नाव

ii. प्रकरणाचे उद्धरण

iii. मा उच्च न्यायालयाने संपूर्ण उत्तराखंड राज्यात हत्तींवरून फेरफटका मारण्यास बांधी घालण्याबाबत आणि वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला विविध क्षेत्रात वहन क्षमता निश्चित करण्याचे निर्देश देण्याबाबत जारी केलेल्या आदेशाची प्रत.

दिनांक १५.०५.२०१९ रोजीच्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जाची सत्य प्रत प्रस्तुत अपीलास अनुसूची क्र ६ म्हणून संलग्न केली आहे.

७. केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने दिनांक २२.०.२०१९ रोजी पुढील उत्तर दिले:-
*"तुमच्या प्रश्नाच्या संदर्भात, वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाकडे निकालाची प्रत नसल्याने कृपया मुख्य वन्यजीव वॉर्डन, उत्तराखंड यांच्याशी संपर्क साधा."*

केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याच्या दिनांक २२.०.२०१९ रोजीच्या उत्तराची सत्य प्रत अनुसूची क्र ७ म्हणून प्रस्तुत अपीलाला संलग्न केली आहे.

८. केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराबाबत असमाधानी असल्याने अपीलकर्त्याने दिनांक ३०.०.२०१९ रोजी प्रथम अपीलिय प्राधिकरणापुढे पुढील मुद्द्यांच्या आधारे प्रथम अपील केले:-

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या माध्यमांनी या विषयावर भर देत त्याला ठळक प्रसिद्धी दिली. वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला ०३.०८.२०१८ रोजी दिलेल्या आदेशाबाबत वेगवेगळया प्रमुख माध्यम संस्थांनी एकसारख्या बातम्या प्रसिद्ध केल्या.
या सर्व माध्यमसंस्थांनी वारतांकण करताना तथ्यात्मक चुका केल्या असे म्हणणे अशक्य आहे.
केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने माहितीच्या अधिकाराखालील अर्जाच्या मजकुराचा चुकीचा अर्थ लावला. अर्जदाराने दिनांक ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत मागितली असताना केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने 'निकाल' असे वाचले.
माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ६(३) अन्वये माहितीच्या अधिकाराखालील अर्ज अन्य सुयोग्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे अंतरीत करता येतो. मुख्य वन्यजीव वॉर्डन, उत्तराखंड यांच्याकडे जाण्याची सूचना करण्याच्या ऐवजी केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने अर्ज त्यांच्याकडे अंतरीत करणे आवश्यक होते.

दिनांक ३०.०.२०१९ रोजीच्या प्रथम अपीलाची सत्य प्रत प्रस्तुत अपीलास अनुसूची क्र ८ म्हणून संलग्न केली आहे.

९. प्रथम अपील प्राधिकाऱ्याने दिनांक १४.०६.२०१९ रोजी आदेश जारी करताना पुढील मुद्दे ग्राह्य धरले:-

वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या अभिलेखावर अशी कोणतीही माहिती नाही.

मागितलेली माहिती मुख्य वन्यजीव वॉर्डन, उत्तराखंड यांच्या कार्यालयाशी संबंधित असण्याची शक्यता असल्याने अपीलार्थीला त्यांच्याकडे जाण्याची सूचना करण्यात आली.
माहितीच्या अधिकाराखालील अर्ज केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने पूर्वीच निकाली काढला असल्याने अपीलिय प्राधिकारणास तो अन्य कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे पुढे पाठवण्याचा अधिकार नाही.

प्रथम अपील प्राधिकाऱ्याने दिनांक १४.०६.२०१९ रोजी जारी केलेल्या आदेशाची सत्य प्रत प्रस्तुत अपीलास अनुसूची क्र ९ म्हणून संलग्न केली आहे.

१०. मा विद्वान प्रथम अपील प्राधिकाऱ्याच्या दिनांक १४.०६.२०१९ रोजी जारी केलेल्या आदेशामुळे व्यथित अपीलार्थीने या मा आयोगापुढे या प्रकरणासंदर्भात द्वितीय अपील सादर केले. अपीलार्थीने त्याच्या आधीच्या अपील याचिकेत नमूद केले की:-

मा उत्तराखंड उच्च न्यायालयाने त्याच्या दिनांक ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशान्वये वाईल्ड्लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला दिरदेश दिल्याबाबत माध्यम संस्थांनी ठळक प्रसिद्धी दिली आहे.
अपीलार्थीला माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ५(३) अन्वये रास्त दिलासा देण्यात आलेला नाही. त्याच कलमान्वये माहिती देण्यासाठी अर्ज सुयोग्य प्राधिकरणाकडे अंतरीत करणे आवश्यक होते.
कलम ६(३) अन्वये अर्ज सुयोग्य प्राधिकरणाकडे अंतरीत होणे आवश्यक होते.
उत्तराखंड राज्य शासन आणि मा उत्तराखंड उच्च न्यायालयाला माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल सुरू करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ६(३) अन्वये योग्य ते आदेश देण्यात यावेत.

दिनांक १०.०७.२०१९ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपीलाची सत्य प्रत प्रस्तुत अपीलास अनुसूची क्र १० म्हणून संलग्न केली आहे.

<u>आधार आणि युक्तिवाद:-</u>

११. मा उत्तराखंड उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशान्वये संपूर्ण उत्तराखंड राज्यात हत्तींवरून फेरफटका मारण्यावर बंदी घातली असून त्यापुढे जाऊन वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला कॉर्बेट, कलाघर आणि राजाजी राष्ट्रीय उद्यानांमध्ये क्षेत्रीय विभागांमध्ये किती परवानग्या देता येतील ही संख्या निश्चित करण्यासाठी या तीन राष्ट्रीय उद्यानांची वहन क्षमता निर्धारित करण्यासाठी तीन महिन्यात सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले असल्याचे वृत्त देशातील प्रमुख माध्यमसंस्थांनी प्रसिद्ध केले आहे.

माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाला मा. उच्च न्यायालयाने त्याच्या दिनांक ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या निर्देशाबाबतच्या समान तथ्याबाबत सर्व माध्यमसंस्थांनी एकमताने मोठ्या प्रमाणावर चुकीच्या बातम्या दिल्या ही मान्य करणे जवळपास अशक्य आहे.

त्यापुढे, वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, डेहराडून मा उत्तराखंड उच्च न्यायालयाच्या अधिकारितेखाली येते हे येथे नमूद करणे संयुक्तिक ठरेल. मा उत्तराखंड उच्च न्यायालयाचा विधिविषयक

पूर्वेतीहास पाहता, वार्तांकनाच्या आधारे कायदेशीर बाबींचा निर्णय करण्याची प्रथा असल्याचे स्पष्ट होते. विपुल जैन विरुद्ध उत्तराखंड राज्य शासन (डब्ल्युपीपीएल क्र 2019 ची 21) या प्रकरणात मा उत्तराखंड उच्च न्यायालयाने केवळ बातम्यांवर विश्वास ठेवत महत्वपूर्ण निकाल दिला आहे. मा न्यायालयाने नमूद केले आहे की, *“१०९. ... पत्रे आणि वृत्तपत्रांमधील वार्तांकन मा सर्वोच्च न्यायालयाला त्याच्या जनहित याचिकांच्या संदर्भातील अधिकारितेखाली दखल घेण्यासाठी पुरेसा आधार ठरत असल्यास, वृत्तपत्रातील बातम्याना राज्य निवडणूक आयोगाविरुद्धच्या तक्रारी न समजण्यास आणि त्यात केलेल्या आरोपांची तातडीने चौकशी न करण्यास आणि ते सत्य असल्याचे सिद्ध झाल्यास अशा भ्रष्ट प्रकारांच्या विरोधात कडक कारवाई करून त्यांचे समूळ उच्चाटन न करण्यास कोणतेही कारण नाही. कार्यवाही करण्यासाठी लेखी तक्रार प्राप्त होण्याची वाट पहाण्याच्या ऐवजी राज्य निवडणूक आयोगाने (वृत्तपत्रातील बातम्यांसह) कोणत्याही श्रोतामधून प्राप्त झालेल्या माहितीला ज्यांच्यासंदर्भात कारवाई आवश्यक आहे अशा तक्रारी समजावे. चौकशीअंती अशी माहिती खरी नसल्याचे सिद्ध झाल्यास पुढे कारवाई करण्याची आवश्यकता नाही हे वेगळे नमूद करण्याची गरज नाही. दुसऱ्या बाजीला जर अशा माहितीला काही आधार असल्याचे सिद्ध झाल्यास मुक्त आणि नि:पक्षपाती निवडणुका होतील याची खात्री पटवण्यासाठी पंचायत राज संस्थांवर खंड आणि जिल्हा अशा दोन्ही पातळ्यांवर तातडीने कारवाई करायला हवी.”*

त्यापुढे जाऊन, मा न्यायालयाने याच निरीक्षणांचा गोषवारा निकालाच्या ११७व्या परिच्छेदाच्या मुद्दा क्रमांक १७ मध्ये पुढीलप्रमाणे दिला:-

*“११७ (१७.) .... पत्रे आणि वृत्तपत्रांमधील वार्तांकन मा सर्वोच्च न्यायालयाला त्याच्या जनहित याचिकांच्या संदर्भातील अधिकारितेखाली दखल घेण्यासाठी पुरेसा आधार ठरत असल्यास, वृत्तपत्रातील बातम्याना राज्य निवडणूक आयोगाविरुद्धच्या तक्रारी न समजण्यास आणि त्यात केलेल्या आरोपांची तातडीने चौकशी न करण्यास कोणतेही कारण नाही.*

अशा प्रकारे, विधिक दखलपात्रतेसाठी वार्तांकनाला सादर करून घेण्यात काहीही गैर नाही या तथ्याची मा न्यायालयाने दखल घेतली आहे याची येथे नोंद घेणे सयुक्तिक ठरेल. माहिती खरी असल्यास, पुढे चौकशी जारी ठेवता येईल, अन्यथा त्यापुढे कोणतीही कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

१२. मा. उत्तराखंड उच्च न्यायालयाने दिनांक ०३.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या प्रतीच्या शोधात अपीलार्थी जागोजागी गेला. तथापि, दिनांक ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाबाबत उपलब्ध झालेले कमाल तपशील माध्यमसंस्थांनी दिनांक ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाबाबत प्रसिद्ध केलेले वृत्तान्त एवढेच होते. परिणामी, अपीलार्थीने आदेशाची प्रत मिळवण्यासाठी या अपीलाची विषयवस्तू असलेला माहितीच्या अधिकाराखालील अर्ज वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाकडे सादर केला. परंतु, माहिती अधिकाऱ्याने आणि अपीलिय प्राधिकाऱ्याने त्या त्या टप्प्यांवर माहिती नाकारली.

त्यानंतर जेव्हा अपीलार्थीला प्रकरणाचे तपशील मिळाले, तेव्हा त्याच्या असे लक्षात आले की ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत मा उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध नाही. या अपीलाला

जोडलेल्या अनुसूची क्र ५ वरून आढळून येते की ०३.०८.२०१८ रोजीचा आदेश प्रकरणाच्या सूचीमध्ये नसल्याने उपलब्ध नाही.

०३.०८.२०१८ रोजीचा आदेश मा उत्तराखंड उच्च न्यायालयाने रिट याचिकेच्या (जनहित याचिकेच्या) सुनावणी दरम्यान पारित केला आहे हे येथे नमूद करणे सयुक्तिक आहे. जनहित याचिकेच्या विधितत्व मीमांसेंनुसार, मा न्यायालयांनी जनहित याचिकांमध्ये दिलेले आदेश सर्व समाजासाठी असतात. त्यापुढे, उत्तराखंड शासन विरुद्ध बळवंत सिंग चौफल आणि अन्य ((२०१०) ३एससीसी ४०२) या प्रकरणात नमूद केले आहे की:-

*"२७. ब्लॅकस लॉ डिक्शनरी (६वी आवृत्ती) यात जनहित याचिकेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे:- " जनहित – ज्यात जनता, सामान्य समाजाचे काही धनविषयक हित किंवा ज्यामुळे विधिक अधिकार किंवा दायीत्वांवर परिणाम होईल असे हित. याचा अर्थ केवळ कुतूहल ठरेल एवढे संकुचित, किंवा प्रश्नांकीत बाबीने परिणाम होईल असे विशिष्ठ परिसराचे हित असा नाही. स्थानिक, राज्य किंवा राष्ट्रीय सरकारच्या कारभारामध्ये सामान्यता लोकांचे असलेले समान हित."*

अशा प्रकारे ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची मा उत्तराखंड उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवरील अनुपलब्धता हा अपीलार्थीला ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत अनुपलब्ध असण्यासाठी सबळ कारण ठरत नाही. अपीलार्थीचा समाजाच्या हितामध्ये सहभाग आहे आणि ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत मिळवण्यात त्याला बाधा आणली न जाणे आवश्यक आहे.

१३. केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने त्याच्या दिनांक २२.०.२०१९ रोजीच्या आदेशान्वये अपीलार्थीला कळवले की मागण्यात आलेली आदेशाची प्रत वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, डेहराडूनकडे उपलब्ध नाही. त्यापुढे, अपीलार्थीला माहिती मिळवण्यासाठी मुख्य वन्यजीव वॉर्डन, उत्तराखंड यांच्याकडे जाण्याचे निर्देश देण्यात आले.

प्रथमत:, अपीलार्थीने 'आदेशाची' प्रत मागवली होती, 'निकालाची' नाही हे येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तरातून सार्वजनिक माहितीशी संबंधित प्रकरणे हाताळण्याबाबतचा त्याचा वरवरचा आणि हयगयीचा दृष्टीकोण दिसून येतो. 'आदेश' आणि 'निकाल' यात मूलभूत विधिक फरक आहे हे वेगळे नमूद करण्याची आवश्यकता नाही.

द्वितीयत:, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर माहितीचा अधिकार अधिनियमाचे उल्लंघन करतो. अर्ज सुयोग्य प्राधिकरणाकडे अंतरीत न केल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ५(३) आणि ६(३) अन्वये अपीलार्थीला रास्त सहाय्य पुरवण्यात केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास अपयश आले आहे. उलटपक्षी, माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ६(३)(i) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर न करून केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज पाठवण्यापासून स्वत:ची सोडवणूक करून घेतली आणि अशा प्रकारे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे उल्लंघन करणारे वर्तन केले.

१४. अशा प्रकारे सार्वजनिक अधिकारी म्हणून अवत:ची सोडवणूक करून घेण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियमाचा गैरवापर करण्याखेरीज केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत मिळवण्यासाठी अपीलार्थीला मुख्य वन्यजीव वॉर्डन, उत्तराखंड यांच्याकडे जाण्यास सुचवले. उपरोक्त बाबी विचारात घेता आणि कोव्हिड-१९ विषाणूची साथ ध्यानात घेता, अपीलार्थीने त्याच्या प्रयत्नांची शर्थ केली आणि माहिती मिळवण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी धाव घेतली. परिणामी, मोठ्या प्रमाणात माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ६(१) अंमलबजावणी होत नसल्याचे अपीलार्थीच्या निदर्शनास आले. माहितीचा अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी सुरू होऊन १ वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरीदेखील उत्तराखंड शासनाने माहितीच्या अधिकाराखालील अर्ज ई-फायलिंग पद्धतीने सादर करण्यासाठी व्यवस्था करण्याचे सुनिश्चित केलेले नाही. अधिनियमाच्या कलम ६(१) अन्वये केलेल्या निसंदिग्ध तरतुदींनुसार ऑनलाईन पद्धतीच्या उपलब्धतेमुळे माहिती अधिकार अधिनियमाला कोणतीही बाधा येत नाही. ही तरतूद निश्चित, तडजोड न होण्यासारखी आणि अंमलबजावणी अनिवार्य असलेली आहे.

परिणामी, अंमलबजावणी नसल्याने आणि कोव्हिड-१९ च्या साथीमुळे, अपीलार्थीने उत्तराखंड वन खात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांशी ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत मिळवण्यासाठी ई-मेल द्वारे संपर्क साधला. परंतु, वास्तवात अपीलार्थीने पाठवलेल्या ई-मेल्सना कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. उलटपक्षी, दोन ई-मेल पत्ते चुकीचे निघाले. यावरून सार्वजनिक प्राधिकरणांचा उघड खोटेपणा आणि गैरप्रकार निदर्शनास येतात.

अपीलार्थीने ०३.०८.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत मिळवण्यासाठी मा उत्तराखंड उच्च न्यायालय आणि मुख्य वन्यजीव वॉर्डन, उत्तराखंड यांच्याकडे देखील हाच माहितीच्या अधिकाराखालील अर्ज सादर करण्याचा उद्देश बाळगला होता. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ६(१) ची अंमलबजावणी नसल्याने आणि कोव्हिड-१९ साथीमुळे माहितीच्या अधिकाराखालील हे अर्ज सादर करणे अपीलार्थीला शक्य झाले नाही.

अशाप्रकारे, माहितीचा अधिकार अधिनियमाच्या एका भागाची अंमलबजावणी होत नसल्यामुळे अपीलार्थीला भारताच्या संविधानाच्या कलम १९ अन्वये हमी देण्यात आलेल्या त्याच्या भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर करण्यात अडथळा आल्याचे जाणवले.

वनखात्याच्या अधिकाऱ्यांना पाठवलेल्या दिनांक १६.०४.२०२० रोजीच्या ई-मेल्सच्या प्रती सामुहिकपणे या अपीलाला अनुच्छेद क्र ११ (सामूहिक) च्या माध्यमातून जोडण्यात आलेल्या आहेत.

१५. अपीलार्थीने त्याचे ३०.०.२०१९ रोजीचे प्रथम अपील सादर करून अपीलार्थीला माहिती पुरवण्यात यावी, किंवा अर्ज अन्य संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे अंतरीत करण्यात यावा अशी विनंती केली होती. प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याने त्याच्या १३.०६.२०१९ रोजीच्या आदेशान्वये केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचा निर्णय ग्राह्य धरला आणि पुढे असेही नमूद केले की एक अर्ज केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने एखादा अर्ज निकाली काढल्यानंतर अपीलिय प्राधिकाऱ्यास तो अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे अंतरीत करण्याचा कोणताही अधिकार नाही.

येथे हे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रथमत:, अपीलार्थीने त्याच्या युक्तिवादात विनंती केली होती की त्याचा अर्ज निकाली काढण्याऐवजी 'प्राधिकाऱ्यास' तो अर्ज सुयोग्य खात्याकडे पाठवण्याचे निर्देश देण्यात यावेत. केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास आदेश देण्याच्या ऐवजी अपीलिय प्राधिकाऱ्याने केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने एकदा एखादा अर्ज निकाली काढल्यानंतर तोच अर्ज अन्य प्राधिकरणाकडे पाठवता येणार नाही असा आधार देत ते अपील फेटाळले. येथे हे नमूद करणे योग्य ठरेल की अपीलार्थीने त्याच्या युक्तिवादात कोठेही त्याचा युक्तिवाद अपीलिय प्राधिकाऱ्याने स्वत: अर्ज पाठवावा एवढा संकुचित केलेला नव्हता. अपीलार्थीने 'प्राधिकारी' असा शब्द वापरला होता. असे असूनही, अपीलिय प्राधिकाऱ्याने माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ६(३) अन्वये केलेल्या तरतुदींचा वापर न करता आणि अपील अर्जाच्या युक्तिवादाचा खरा अर्थ समजून न घेता निकाली काढला.

द्वितीयत:, अपीलिय प्राधिकाऱ्याची नियुक्ती केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचे निर्णय वैधता आणि योग्यतेच्या आधारे अभिनिर्णीत करण्यासाठी, आणि काही त्रुटि आढळल्यास केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास दुरूस्ती करण्याचे निर्देश देण्यासाठी करण्यात आलेली आहे. या प्रकरणात अपीलिय प्राधिकाऱ्याने कोठेही अपीलार्थीच्या युक्तिवादाचा कलम ६(३) लागू होणार नाही असा प्रतिवाद केलेला नाही. उलटपक्षी, प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याने केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास तो अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाठवण्याचे निर्देश देणे आवश्यक होते. त्याशिवाय, कार्मिक आणि प्रशिक्षण खाते, प्रशिक्षण खाते, पीजी आणि पेन्शन (भारत सरकार) यांनी त्यांच्या दिनांक २.०४.२००८ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रथम अपीलिय प्राधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. या आदेशात निश्चित तरतूद केली आहे की:-

*"२. आपली कर्तव्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी, अपीलिय प्राधिकाऱ्याने अधिनियमाचा काळजीपूर्वक अभ्यास करून त्यातील तरतुदी अचूकपणे समजून घेणे आवश्यक आहे. हा दस्तऐवज विशेषत: प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याला माहिती हव्या असणे अशा अधिनियमाच्या काही बाजू स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत."*

उपरोक्त प्रकाशात ज्ञापनाच्या पान ७ वर बिन्दु क्र १७ ते २० मध्ये केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचे वर्तन अभिनिर्णीत करताना 'अर्जाचे अंतरण' या घटकाचे सखोल स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे आणि त्यामुळे बिन्दु क्र ३० मध्ये 'अपील निकालात काढणे' या शीर्षकाखाली मार्गदर्शन केले आहे की:-

*"३८. माहितीचा अधिकार अधिनियमाखालील अपीलांवर अभिनिर्णय देणे हे न्यायिकवत कार्य आहे. त्यामुळे अपीलिय प्राधिकाऱ्याने केवळ न्यायनिवाडा केला जाणार नाही तर तो केला असल्याचे देखील दृश्यमान होईल अशी खबरदारी घेणे आवश्यक आहे. यासाठी अपीलिय प्राधिकाऱ्याचे आदेश निर्णयाप्रत पोहोचण्याची कारणे विषद करणारा सकारण आदेश असावा."*

त्यामुळे या प्रकरणात अपीलिय प्राधिकाऱ्याचे वर्तन कार्मिक आणि प्रशिक्षण खात्याने २.०४.२००६ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे गंभीर उल्लंघन आहे.

तृतीयत:, माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कोठेही प्रथम अपीलिय प्राधिकरणाला अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाठवण्यापासून रोखण्यात आलेले नाही.

चतुर्थत:, माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(२) अन्वये प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्यामध्ये केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने अर्जावर योग्य कार्यवाही केलेली असल्यास किंवा नसल्यास, अभिनिर्णय देण्याची जबाबदारी सोपवलेली आहे. नमित शर्मा विरुद्ध भारत सरकार ((२०१३) १ एससीसी ७४५) या प्रकरणात मा सर्वोच्च न्यायालयाने सध्या प्रचलित असलेला माहिती अधिकार अधिनियम २००५ विशेषत: केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचे निर्णय तपासण्यासाठी अन्वेषक शक्ति अपीलिय यंत्रणेमध्ये प्रस्थापित करण्यासाठी आणला असल्याच्या तथ्याची दाखल घेतली आहे. असे असूनही, आपल्या शक्तीचा वापर न करून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या आत्मा आणि प्रास्ताविकाला उचलून धरण्यात या प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्यास अपयश आले आहे. यासंदर्भात सुसंगत भाग खाली देण्यात येत आहे:-

*"२८. ...* माहिती अधिकार अधिनियम विधेयक त्याच्या उद्देश आणि माहितीची पोहोच अधिक बृहत आणि अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशिकेसह सादर करण्यात आले होते. २००२चा अधिनियम अधिक प्रागतिक, सहभागयुक्त आणि सार्थक बनवणे आवश्यक होते. त्यात सामील करायच्या महत्वाच्या बदलांमध्ये जन माहिती अधिकाऱ्याचे निर्णय तपासण्यासाठी जिच्यात अन्वेषक शक्ति आहे अशा अशी अपीलिय यंत्रणेची स्थापना, कायद्यानुसार माहिती पुरवण्यात अपयश आल्यास त्यासाठी दंडात्मक तरतुदी करणे इत्यादींचा समावेश होता. हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केले आणि दिनांक १५ जून २००५ रोजी त्याला राष्ट्रपतींची अभिमान्यता मिळाल्यावर ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या स्वरुपात कायदा म्हणून अस्तीत्वात आले."

त्यापुढे न्यायालयाने नमूद केले की जन माहिती अधिकाऱ्याहून अपीलिय प्राधिकरणांची भूमिका आणि निर्णय यांना अधिक महत्व आहे, कारण त्यांचा उगम न्यायिक निर्णय प्रक्रियेतून होतो. अशा प्रकारे, विचार करताना विधिक परिस्थिती ध्यानात घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात सुसंगत भाग खाली दिलेला आहे:-

*"६०. जन माहिती अधिकाऱ्यासमोर वाद संकुचित परिघात दिसू शकतो. परंतु, प्रथम अपीलिय प्राधिकारी आणि विशेषत: माहिती आयुक्त (आयोगाचे सदस्य) यांचे स्वरूप अत्यंत महत्वाचे आहे. अशा तडजोडीचा आघात प्रशासकीय अभिनिर्णयाकडे झुकण्याहून विशिष्ठ अभिमुख असून तो न्यायिक निर्णय प्रक्रियेकडे झुकतो. विवेकबुद्धीचा वापर आणि सकारण आदेश २००५ च्या अधिनियमाच्या योजनेत अंतर्भूत आहेत. वस्तूत:, या संदर्भात अधिनियमाच्या तरतुदी निश्चित आहेत. विवेकबुद्धीचा वापर करताना वादप्रश्नाचे विधिक सार आणि परिणाम यावर भर असणे आवश्यक आहे."*

उलटपक्षी, या प्रकरणात प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींशी सुसंगत कारवाई करण्यात अपयश आलेले आहे.

त्याशिवाय, मा. सर्वोच्च न्यायालयाने अपीलिय प्राधिकाऱ्याच्या अभिनिर्णयात सविस्तर मतप्रदर्शन करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे. या संदर्भात सुसंगत भाग खाली दिला आहे:-

*"१६. ... अपीलिय प्राधिकारी आणि आयोगाचे आदेश सामनेवाल्या पक्षाचा विरोध असूनही एका पक्षाला दिलास देत असल्याने किंवा विधिक हक्काचा वापर करून माहिती मागण्याची विनंती नाकारणारे असल्याने त्यांना पुरेशा तर्काचा आधार असणे आवश्यक आहे.*

*१७. आपल्या निर्णयाच्या समर्थनार्थ कारणे देणे हे न्यायाधिकरणांसह प्रत्येक अभिनिर्णय करणाऱ्या संस्थेचे परम कर्तव्य आहे. तर्क हा निर्णयाचा आत्मा असतो आणि नैसर्गिक न्यायतत्व ज्या पायावर उभे रहाते त्याच्या तीनपैकी एक स्तंभ ते असते. दावेदाराला त्याचा दावा ज्या आधारे नाकारला गेला त्याबाबत तर्क माहितीपर असतो आणि त्यामुळे आदेशाला उच्च प्राधिकरण/ संवैधानिक न्यायालयात आव्हान देण्यास कारणे मिळतात. त्यामुळे तर्कामुळे ज्यांच्यापुढे आदेशाला आव्हान दिलेले आहे अशी प्राधिकरणे संबंधित आदेशाचे सत्यवादीत्व आणि अचूकपणा तपासण्यास समर्थ होतात. सध्याच्या काळात प्रशासनाची कार्यपद्धती आणि न्यायिकवत कार्ये यातील सीमारेषा धूसर होत असल्याने प्रशासकीय संस्थांसाठीही ..."*

उलटपक्षी, सविस्तर कारणे देण्यात या प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्यास अपयश आलेले आहे. प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याने ज्या तरतुदींच्या अन्वये अपीलिय प्राधिकरणास अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्ज पाठवण्यापासून रोखले आहे त्यांचा संदर्भ दिलेला नाही, किंवा हा तर्क ज्यात वापरलेला आहे अशा निर्णय विधिला उद्धृत केलेले नाही.

अशा प्रकारे, मा सर्वोच्च न्यायालयाच्या अधिनिर्णयाच्या विरोधात, प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याला त्याची कर्तव्ये पार पाडण्यात आणि केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचा निकाल ग्राह्य धरण्यात अपयश आलेले आहे. प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी आणि आत्म्याला उचलून धरण्यात आणि प्रकरणाचा निर्णय करताना विवेकबुद्धी वापरण्यात अपयश आलेले आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रथम अपीलिय अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांसाठी जारी भारत सरकारने केलेल्या मार्गदर्शक सूचना ज्यात आहे त्या ज्ञापनाची सत्य प्रत या अपीलाला अनुच्छेद क्र १२ म्हणून जोडलेली आहे.

१६. माहितीचा अधिकार अधिनियमाचे तत्व अर्जदारांच्या स्थितीस बळकटी आणते. कलम ५(३) आणि ६(३) सारख्या तरतुदींच्या समावेशामुळे अर्जदारास माहिती नाकारणे जवळपास अशक्य झाले आहे. मा आयोगाच्या निर्णयामुळे दर्जाच्या गैरवापराच्या संदर्भात काळजी घेतली गेलेली आहे, परंतु एकमेकांशी सलगपणे जोडलेल्या खात्यांना एकमेकांशी माहिती पुरवण्याच्या संदर्भात समन्वय साधण्यापासून आणि एकमेकांना सहकार्य करण्यापासून रोखले गेले आहे.

उपरोक्त बाबींच्या परिप्रेक्षात, वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया आणि मुख्य वन्यजीव वॉर्डन ही दोन्ही प्राधिकरणे त्यांच्या कर्तव्यांच्या संदर्भात एकमेकांशी घट्ट जोडली गेलेली आहेत. ही दोन्ही प्राधिकरणे

वन्यजीवनाचे अभिरक्षण आणि संरक्षण यासाठी कार्यरत आहेत. सचिवांच्या मार्फतीने रेल्वे मंत्रालय आणि अन्य विरुद्ध गिरीश मित्तल (डब्ल्यु पी (सी) ६०८८/२०१४ आणि सीएम क्र १४७९९/२०१४, १४८००/२०१४) यात फाईल क्र सीआयसी/एडी/ए/२०१२/००१९२४ च्या प्रकरणात केंद्रीय माहिती आयोगाने कलम ६(३) च्या परिप्रेक्षात दिलेल्या केंद्रीय जन माहिती आयोगाने घट्टपणे जोडलेल्या खात्यांकडे अर्ज पाठवणे बंधनकारक आहे हा निर्णय ग्राह्य धरला आहे. त्यातील संबंधित भाग खाली उधृत केलेला आहे:-

*"१५. अधिनियमाच्या कलम ६(३) ची भाषा दर्शवते की सार्वजनिक प्राधिकरण अर्ज किंवा ज्यात मागवलेली माहिती अन्य प्राधिकरणाच्या कार्याशी घट्ट जोडलेली आहे असा त्याचा भाग अशा अन्य प्राधिकरणाकडे पाठवावा. या प्रकरणातील याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांनी अधिनियमाच्या कलम ६(३) च्या तरतुदींवर दिलेला भर प्रकरणाच्या तथ्य आणि परिस्थितीत स्पष्टपणे चुकीचा आहे. ज्यात अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाठवलेल्या प्रश्नांच्या संदर्भात दंड केला आहे असे हे प्रकरण नाही तर याचिकाकर्ता क्र २ ज्या प्राधिकरणात जन माहिती अधिकारी आहे त्या सार्वजनिक प्राधिकरणाने संबोधित करण्याच्या प्रश्नांच्या संदर्भात आहे. अधिनियमाचे कलम ६(३) चे वाचन केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचे कर्तव्य केवळ अर्ज वेगवेगळया खाती/ कार्यालयांकडे पाठवण्यापुरते मर्यादित नाही. एका सार्वजनिक प्राधिकरणाने दुसऱ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज पाठवणे केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने त्याच्या स्वत:च्या संस्थेतून माहिती जमा करणे किंवा मिळवणे यासारखे नाही. या प्रकरणात प्रतिवादीला न पुरवलेली विशिष्ठ माहिती निर्विवादपणे रेल्वे बोर्डाकडे उपलब्ध असेल आणि केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने ती पुरवणे आवश्यक होते. केवळ प्रश्न अन्य अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आलेले आहेत असे सांगून तो माहिती पुरवण्याच्या त्याच्या जबाबदारीतून तो मुक्त होऊ शकत नाही. नि:संशय, केंद्रीय माहिती आयोगाच्या निर्देशांचे पालन झाले नाही. "*

अशा प्रकारे, कलम ६(३) अन्वये घट्टपणे जोडलेल्या खात्याकडे अर्ज अंतरीत करणे केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यासाठी बंधनकारक आहे. त्याशिवाय, केवळ घट्टपणे जोडलेल्या खात्याकडे अर्ज अंतरीत करून केंद्रीय जन माहिती अधिकारी त्याच्या कर्तव्यातून मुक्त होत नाही. मागवलेली माहिती पुरवणे हे केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे.

उलटपक्षी, या प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियम, या मा आयुक्ताचे आदेश, तसेच मा सर्वोच्च न्यायालय आणि वेगवेगळया अन्य उच्च न्यायालयांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात जन माहिती अधिकाऱ्यास अपयश आले आहे.

१७. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २१ नुसार, सदिच्छेपोटी केलेल्या कोणत्याही कृतीच्या विरोधात कोणताही वाद, खटला किंवा अन्य विधिक कार्यवाही सुरू करता येणार नाही. अपीलार्थी पर्यावरणविषयक कायद्याचा अभ्यासक असून, हत्तींच्या अभिरक्षण आणि संरक्षणासाठी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कार्य करत आहे. माहितीच्या अधिकाराखालील हा अर्ज राष्ट्रीय वारसा असलेल्या हत्ती या प्राण्याच्या अभिरक्षणासाठीच्या सदिच्छेपोटी सादर केला होता.

मा केरळ उच्च न्यायालयाने अमृता एम जॉर्ज वि स्पाईसेस बोर्ड (डब्ल्युपी (सी) क्र २०१५ चा १३५२८ (एम)) या प्रकरणात जारी केलेल्या ०३.०८.२०१५ या तारखेने दिनांकीत निकालात ग्राह्य धरले आहे कीः-

*त्याखेरीज, याचिकाकर्त्याच्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी केलेल्या माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम २१ नुसार अधिनियमानुसार अर्ज करणाऱ्या अर्जदाराला संरक्षण मिळते या युक्तिवादात मला समर्थनीयता आढळते. प्रतिवादीच्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी केलेला हे संरक्षण केवळ या अधिनियमाखाली प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करणाऱ्या अधिकाऱ्यांना विधिक कारवाईपासून उन्मुक्ती पुरवते हा युक्तिवाद मला पटत नाही, कारण माहितीचा अधिकार अधिंनियमाच्या कलम २१ अन्वये केलेली प्रत्यक्ष तरतूद तिचा असा कोणताही संकुचित अर्थ लावण्यास मान्यता देत नाही."*

अशा प्रकारे, हत्तींच्या अभिरक्षणासाठीच्या सदिच्छेपोटी केलेल्या सर्व कृती ध्यानात घेऊन अपीलार्थीच्या बाजूने आदेश मंजूर करण्यासाठी आवश्यक गुण या अपीलात आहेत.

१८. येथे हे नमूद करणे सयुक्तिक ठरेल की माहिती नाकरण्याच्या आणि कर्तव्यापासून परन्मुख होण्याच्या बेकायदा कृतीमुळे, सुनावणीच्या या दिवसापर्यंत ७२९ दिवस (१ वर्ष, ११ महीने, २८ दिवस) म्हणजेच सुमारे दोन वर्षे विलंब झालेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमाचे उद्दीष्ट अर्ज सादर केल्या दिवसापासून ३० दिवसात माहिती पुरवण्याचे आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचे पालन न केल्यामुळे हा अभूतपूर्व विलंब होऊन अपीलार्थीच्या उद्देशाला बाधा पोहोचली आहे.

तरी, माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २० नुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती न देण्यासाठी प्रतिवादीच्या विरुद्ध भारी दंड आकारणी आणि खात्यांतर्गत चौकशीचे आदेश दिले जाणे आवश्यक आहे.

## प्रार्थना

तरी अपीलार्थी नम्रपणे आणि आदरपूर्वक प्रार्थना करतो की, उपरोक्त तथ्ये, वादबिंदू, युक्तिवाद आणि उद्धरणे विचारात घेऊन मा आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित करावेत:-

i. डब्ल्युपी (पीआयएल) क्र २०१२ ची ६ या प्रकरणात ०३.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाची प्रत अपीलार्थीला पुरवण्याचे आदेश केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास देण्यात यावेत.

किंवा

डब्ल्युपी (पीआयएल) क्र २०१२ ची ६ या प्रकरणात ०३.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाची प्रत अपीलार्थीला पुरवण्याचे आदेश मुख्य वन्यजीव वॉर्डन यांना देण्यात यावेत.

किंवा

डब्ल्युपी (पीआयएल) क्र २०१२ ची ६ या प्रकरणात ०३.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाची प्रत अपीलार्थीला पुरवण्याचे आदेश मा उत्तराखंड उच्च न्यायालयाच्या मुख्य निबंधकांना देण्यात यावेत.

ii. उत्तराखंड शासनास माहितीच्या अधिकाराखालील अर्ज कलम ६(१) अन्वये ऑनलाइन सादर करण्यासाठी पोर्टल सुरू करून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे पालन करण्याचे निर्देश देण्यात यावेत.

iii. कलम २६(१)(ड) नुसार जन माहिती अधिकाऱ्यांच्या विकासासाठी प्रशिक्षण कार्यक्रम नियमित सुरू करण्याचे निर्देश भारत सरकारला देण्यात यावेत.

iv. माहिती न पुरवून जवळपास २ वर्षे विलंबास कारणीभूत झाल्यासाठी माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम २० नुसार केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याच्या विरोधात दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

v. समन्याय, न्याय आणि विवेकबुद्धीच्या कसोटीवर योग्य असे अन्य कोणतेही आदेश जारी करावेत.

दिनांक:- ०९/०५/२०२१

अपीलार्थीची सही<br>
(श्री ________________________________________)<br>
अपीलार्थी<br>
दस्तुरखुद्द